**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम -**
ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत विविध योजनांखाली हाती घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.२४३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०४ फेब्रुवारी, २००८**

वाचा: १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु -१०९८/प्र.क.२४५ /पापु-०७, दिनांक ११ जानेवरी, १९९९.
२) शासन निर्णय, पा.पु.व स्व. वि. क्र. ग्रापापु-१००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१
३) शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु- १००५/प्र.क.७४ (२)/पापु-०७, दिनांक २ मे, २००५.
४) शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु -१००५/प्र.क.८५/पापु-०७, दिनांक ९ मे, २००५.

प्रस्तावना:

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे निकष, प्रशासकीय मान्यता / सुधारित प्रशासकीय मान्यता, मंजूरीच्या आर्थिक मर्यादा इत्यादी बाबत सर्वंकष आदेश संदर्भ क्र. १ येथील दिनांक ११ जानेवारी, १९९९ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयानुसार योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार ज्या अधिकाऱ्यांना आहेत त्यांना मुळ योजनेच्या किंमतीच्या १५ टक्के पेक्षा जास्त किंमत नाही अशा सुधारित योजनांना या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींच्या अधिन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

२. दि.२७ जुलै,२००० पासून राज्य शासनाने मागणी आधारित समूह सहभागाचे लोकाभिमुख धोरण ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी स्विकारले आहे. त्या अनुषंगाने पाणी पुरवठा योजनांना मान्यता देण्याबाबतची कार्यवाही संदर्भ क्र. २ येथील शासन परिपत्रक दि.०३ सप्टेंबर,२००१ अन्वये स्पष्ट करण्यात आलेली आहे. तर संदर्भ ३ येथील शासन परिपत्रक दिनांक २ मे, २००५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत व योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. भारत निर्माण कार्यक्रमाचा आढावा / प्रगती बाबत विभागीय स्तरावर / राज्य स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमध्ये क्षेत्रीय अधिका-यांनी मंजूर पाणी पुरवठा योजनेतील साहित्याची भाववाढ (उदा. सिमेंट, स्टील इ.), मूळ उद्‌भवात बदल तसेच इतर तांत्रिक बदलामुळे योजनांच्या किमतीमध्ये वाढ होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. नविन धोरणानुसार महाजल, स्वजलधारा व वर्धित वेग कार्यक्रमा अंतर्गत मंजूर केलेल्या योजनांच्या वाढलेल्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत स्पष्ट आदेश नसल्याने कामाच्या प्रगतीत अडथळे येत आहेत व त्यामुळे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणे शक्य होत नाही असे देखील शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. याबाबत सुस्पष्ट सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. संदर्भ क्र.४ येथील दिनांक ९ मे, २००५ च्या शासन परिपत्रकान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्य शासन पुरस्कृत महाजल व केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजनांना प्रशासकीय मंजूरी व तांत्रिक तपासणीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र, यामध्ये केंद्र पुरस्कृत वर्धीत वेग कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या योजनांचा उल्लेख नव्हता. तसेच, या शासन परिपत्रकामध्ये तांत्रिक तपासणी हा शब्दप्रयोग वापरल्याने या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याबाबतचा संभ्रम संबंधित क्षेत्रीय कार्यालयांना निर्माण झालेला होता. याबाबत स्पष्टीकरण करण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णयः

१. ग्रामीण भागात ग्रामपंचायतीने मान्यता दिलेल्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजना व जिल्हा परिषदेने मान्यता दिलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी सुरु असताना या योजनांमधील उद्भव अयशस्वी ठरल्याने दुसरा उद्भव घ्यावा लागल्यास किंवा साहित्याच्या भाववाढीमुळे किंवा वीज कनेक्शन पोटी केलेल्या तरतूदीत वाढ झाल्यामुळे योजनेच्या किमतीत वाढ झाल्यास, योजनांची किंमत मूळ मंजूर किमतीपेक्षा १५ टक्क्यांपर्यंत वाढली तर अशा स्वतंत्र व प्रादेशिक योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला खाली . अटींच्या आधीन राहून असतील.

१) योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा निधी प्राप्त होण्याच्या आत सुधारित प्रशासकीय खर्चास मान्यता घेण्यात यावी.
२) मुळ प्रस्तावाला लागू असलेल्या इतर सर्व अटी तशाच चालू राहतील.
३) सुधारित प्रशासकीय योजनेत प्रस्तावाच्या मुळ उद्देशात बदल करण्यात येवू नये.
४) सुधारित योजनेस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासून शिफारस करणे आवश्यक राहील.

२. वरील बाबींमुळे योजनेची सुधारित किंमत प्रचलित दरडोई खर्चाच्या निकषापेक्षा (per capita cost) जास्त होत असल्यास आणि किंवा ती मूळ मंजूर किमतीच्या १५ टक्केपेक्षा जास्त होत असेल तर असे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावेत.

३. संदर्भ क्र.३ येथील दिनांक ९ मे, २००५ च्या शासन परिपत्रकातील सूचना राज्य शासन पुरस्कृत पाणी पुरवठा योजना, केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा व वर्धीत वेग कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागू आहेत. तसेच या परिपत्रकातील **तांत्रिक तपासणी या शब्दप्रयोगाऐवजी तांत्रिक मान्यता हा शब्द प्रयोग वापरण्यात यावा** व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक 200८0३0५9५५७३२00१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी) ४-२-0८

**(डॉ. राजन खोब्रागडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,

कृ.मा.प.

**H-2210 -1a**
D:\2008\GR-08-1\CR 243 08 GR.doc